|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

North Maharashtra University, Jalgaon

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office    जनसंपर्क विभाग

### बातमी क्र.१

जळगाव दि. ८ ( ) जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील महिला शिक्षक व महिला कर्मचाऱ्यांनी स्थापन केलेल्या `उमवि मनस्विनी` या महिला समुहाचे उद्‌घाटन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते गुरुवार, दि. ८ मार्च रोजी करण्यात आले.

विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात कुलगुरुंच्या हस्ते मनस्विनी या ग्रुपच्या लोगोचे अनावरण देखील करण्यात आले. महिला दिनानिमित्त नाशिक येथील प्रा.कुमुदिनी फेगडे यांचे ` स्त्री शक्तीचा जागर` या विषयावर व्याख्यान झाले. या समारंभासाठी कुलगुरुंच्या पत्नी अनिता पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील व सुनिता पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.ए.बी.चौधरी व अर्चना चौधरी उपस्थित होते. कुलगुरुंनी आपल्या भाषणात स्त्री सबलीकरणाचा प्रांरभ आपल्या घरापासून व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रारंभी डॉ.मनिषा जगताप यांनी प्रास्ताविकात ग्रुपच्या स्थापने मागची भूमिका सांगितली. विश्रांती मुंजेवार, वैशाली शर्मा, मृणालिनी चव्हाण, सीमा बारी यांनी प्रेरणा गीत सादर केले. यावेळी वैशाली शर्मा, मृणालिनी चव्हाण, कष्टकरी महिलांच्या प्रतिनिधी रंजना चव्हाण, शोभा तांबोळी, भागाबाई कोळी, स्वाती बडगुजर यांचा सत्कार करण्यात आला. लोगो तयार केल्याबद्दल चित्रकार यशवंत गरुड यांचा कुलगुरुंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.मनिषा इंदाणी व जयश्री देशमुख यांनी केले.

प्रा.कुमुदिनी फेगडे यांनी स्त्री सक्षमीकरणाच्या अनेक मुद्यांवर प्रकाश टाकला. डॉ.मंजुषा क्षीरसागर यांनी भारतातील स्त्रीयांची स्थिती व मूल्यांची जाण या विषयी माहिती दिली. अनिता पाटील यांनी आपल्या भाषणात विद्यापीठाच्या विकासात स्त्रीयांचा सहभाग महत्वाचा असल्याचे सांगून हा ग्रुप स्थापन झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैशाली शर्मा, मृणालिनी चव्हाण, कविता मंडोरे, डॉ.पवित्रा पाटील. मनिषा कंडारे या महिलांनी परिश्रम घेतले.

---

### बातमी क्र.२

जळगाव दि. ८ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेतर्फे दि.९ व १० मार्च, २०१८ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सद्य:स्थितील वाढते प्रदुषण आणि वातावरणीय बदल या विषयावर कार्यशाळेत चर्चा होणार असून या विषयांचे चित्रप्रदर्शन व उपकरणांची मांडणी केली जाणार आहे. मुंबई येथील डॉ.रमेश यमगार तसेच डॉ.पी.एस.कुलकर्णी, डॉ.विकास गीते, डॉ.अतुल सरोदे हे मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यशाळेच्या आयोजनासाठी संचालक, प्रा.डॉ.एस.टी.इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजक सचिव डॉ.एस.आर.थोरात परिश्रम घेत आहेत. परिसरातील विविध महाविद्यालये तसेच विद्यापीठाच्या विविध प्रशाळेतील विद्यार्थी यांनी सदर कार्यशाळेत सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रशाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
North Maharashtra University, Jalgaon
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६
'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**



**बातमी क्र.३**

जळगाव. ८ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणितशास्त्र प्रशाळेच्या वतीने राष्ट्रीय गणित दिवसानिमित्त दि. ९ मार्च पासून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार दि.९ मार्च रोजी गणितसुर्य भास्कराचार्य प्रतिष्ठान चाळीसगाव यांच्या सहकार्याने गणित नगरी, पाटण, चाळीसगाव येथे नाशिक येथील दिलीप गोटखिंडीकर, औरंगाबाद येथील श्रीमती डॉ.एम.एस.वासडीकर, प्रा.एस.के.निंभोरकर यांचे व्याख्यान होणार आहे. यावेळी प्राचार्य एस.आर.जाधव, प्राचार्य एम.व्ही.बिल्दीकर उपस्थित राहणार आहेत. १० मार्च रोजी भोपाळ येथील प्रा.व्ही.के.गुप्ता यांचे व्याख्यान होईल. प्राचार्य पी.आर.चौधरी हे यावेळी उपस्थित राहतील. १९ मार्च रोजी बी.एस्सी.(तृतीय वर्ष) आणि एम.एस्सी. (गणित) या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी वस्तुनिष्ठ प्रश्न स्पर्धा होणार आहे. यातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची २५ मार्च रोजी प्रश्नमंजूषा स्पर्धा होईल. याच दिवशी पोस्टर व तोंडी सादरीकरण स्पर्धा होणार आहे. तसेच महाविद्यालयीन शिक्षकांसाठी रामानुजन यांचे योगदान या विषयावर कार्यशाळा होईल अशी माहिती प्रशाळेचे संचालक प्रा.आर.एल.शिंदे, गणित विभागप्रमुख प्रा.एस.आर.चौधरी, कार्यवाहक डॉ.के.एफ.पवार, डॉ.एच.एल.तिडके, डॉ.सी.टी.आगे यांनी दिली.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. ८ मार्च, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी